करुणामय क्रांतीचे विचार-स्पंदन

# लोकानुकम्पा

स्मृतीशेष डॉ. योगेंद्र मेश्राम

स्मृती विशेषांक : २०१८



डॉ.योगेंद्र मेश्राम यांची सामीक्षादृष्टी - डॉ. वंसत शेन्डे १०३
''आंबेडकरी साहित्यातील श्रेष्ठ विचारवंत'' - प्रा.अर्चना हातेकर १०५
ध्यासपर्व नावाचा माणूस : डॉ. योगेंद्र मेश्राम - महेन्द्र गायकवाड १०७
''उत्तुंग'' आंबेडकरी जीवन मूल्यांची समर्थ अभिव्यक्ती - भीमराव गणवीर ११०
लोकानुकम्पामधील डॉ.योगेंद्र मेश्राम यांची संपादकीय भाष्ये -प्रा.मुकेश भा.सरदार ११३
आंबेडकरी साहित्य चळवळीचा भाष्यकार तथा बाणेदार विचारवंत : डॉ.योगेंद्र मेश्राम सर - एम.आर.इंगळे ११६
डॉ. योगेंद्र मेश्राम यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन - प्रल्हाद बोरकर ११८
मी अनुभवलेले डॉ.योगेंद्र मेश्राम- प्रा. डॉ.विद्याधर बन्सोड १२१
डॉ. योगेंद्र मेश्राम यांच्या सहवासात - डॉ. निरज बोधी १२३
आठवणींची साठवण ; डॉ.योगेंद्र मेश्राम सर - डॉ.ईश्वर नंदपुरे १२५
एक संस्मरण : योगेन्द्र मेश्राम यांचे - बबन चांहादे १२७
माझ्या आठवणीतील डॉ.योगेंद्र मेश्राम - चंद्रकांत मुगले १२९
स्नेहबंध जपणारा साहित्यिक - डॉ.योगेंद्र मेश्राम'-ॲड.रमेश एस.टेंभेकर १३०
आठवणीचा अजिंठा : डॉ.योगेंद्र मेश्राम - प्रा.हृदय चक्रधर १३२
लोकानुकम्पाचा मेळावा घडला असता - डॉ. मा.प. थोरात १३५
ऋणानुबंध एका दशकाचे - प्रा. प्रकाश पोहेकर १३८
माझे सर : डॉ.योगेंद्र मेश्राम - वसंत खोब्रागडे IAS (निवृत्त) १४२
दलित-बौद्ध समाजाच्या उत्थानाकरिता वाहून घेणारे-डॉ.योगेंद्र मेश्राम - मन्साराम दहिवले १४४
डॉ.योगेंद्र मेश्राम : काही अधोरेखिते - डॉ.अशोक नामदेव पळवेकर १४५
आमचे दादाजी - अद्वेता राजेश शंभरकर १४६
Few memories of my grandfather - Snehal M. Gajbhiye 147
My grandfather : A Pleasant remembrance - Mrinal M. Gajbhiye 148

**कविता**

योगेन्द्र ! - इ. मो. नारनवरे मुखपृष्ठच्या मागे
।। नारळात पाणी गेलेच कसे ?।। - लोकनाथ यशवंत १५०
कविमित्रा -संजय गोडघाटे १५०
भिक्षापात्र... - वैभव सोनारकर १५१
पाया बुद्धत्त्वाचा -दिगंबर झाडे १५१
आता झालो लाख भीमा - प्रा.आत्माराम गोडबोले १५२
लोकानुकम्पा -हृदय चक्रधर १५२
।। मेश्राम सर ।। -प्रा. रमेश पाटील. १५२



**प्रा.मुकेश भा.सरदार**

# लोकानुकम्पामधील डॉ.योगेंद्र मेश्राम यांची संपादकीय भाष्ये

**प्रतिभावंत लेखक डॉ.योगेंद्र मेश्राम हे सामाजिक दृष्टीला फार महत्त्व देणारे होते, जगात जे-जे काही, सत्य न्याय-नीतीमत्तेच्या करूणा-प्रेम-मैत्रीच्या मानवी मूल्यांना डॉ.योगेंद्र मेश्राम आपल्या संपादकीय मध्ये स्वीकारताना दिसतात. समाजप्रबोधन व परिवर्तनाची प्रेरणा देणारी त्यांची संपादकीय निर्मिती थक्क करणारी अशीच आहे.**

डॉ. योगेंद्र मेश्राम यांचे जीवन संघर्षाच्या काट्यावरून चालणारे होते. आंबेडकरवादी दलित साहित्याच्या प्रचारासाठी एकटेच चालले. असे असले तरी साहित्यसृष्टीतील करुणामय क्रांती विचारांचे साधक व मानवतापूजक डॉ.योगेंद्र मेश्रामांच्या साहित्यसंपदेशी परिचित नसलेल्या मराठी भाषेचा रसिक वाचक सापडणे कठीणच!

सरांचा मूळ पिंडच लेखकाचा आणि तोही निर्भिडपणे आपले मत मांडणाऱ्या संवेदनशील अभ्यास लेखकाचा. समाजाने, देशाने मानवतावादी व्हावे, बुद्धिवादी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोण ठेवावा, दु:खमुक्त, शोषनमुक्त समाजनिर्माण व्हावा. समता-न्यायनिष्ठ नवा मानवसमाज निर्माण व्हावा म्हणून त्यांनी लोकानुकम्पा या नियतकालिकात संपादकीय लिहून आपली आंबेडकरवादी भूमिका स्पष्ट केली. समाजप्रबोधन व परिवर्तनाची प्रेरणा देणारी त्यांची संपादकीय निर्मिती थक्क करणारी अशीच आहे.

प्रतिभावंत लेखक डॉ.योगेंद्र मेश्राम हे सामाजिक दृष्टीला फार महत्त्व देणारे होते, जगात जे-जे काही, सत्य न्याय-नीतीमत्तेच्या करूणा-प्रेम-मैत्रीच्या मानवी मूल्यांना डॉ.योगेंद्र मेश्राम आपल्या संपादकीय मध्ये स्वीकारताना दिसतात.

याउलट असत्य अन्यायाचा, विषमता-भेदभावाचा अमानुषकी अत्याचाराचा, क्रोध-कौर्याचा, ढोंग ईश्वर, अंधश्रद्धा, बुवाबाजी अहंकारी प्रवृत्तीचा ते धिक्कार आपल्या संपादकीय मधून करताना दिसतात. अन्याय शोषणाविरूद्ध लढा देण्यासाठी विद्रोहाचा ज्वालामुखी करणे आवश्यक आहे. पण म्हणून विद्रोह हेच साहित्याचे सर्वस्वमूल्य आहे असे लेखक मानत नाहीत. त्याला विज्ञाननिष्ठेची, करूणा-मैत्रीची अंतिमत: अखिल मानवतेच्या विश्वात्मक मूल्यांची जोड मिळावी, मानवतेच्या सर्जनशील मूल्यांचे संपादकीयमधून प्रसूतीकरण व्हावे याला डॉ.मेश्राम महत्त्व देताना दिसून येतात. म्हणूनच सरांच्या १९८७ ते २००७ पर्यंतच्या संपादकीयमध्ये सामाजिक जाणीवा मौलिक वास्तवपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. दलित साहित्याकरिता, दलित चळवळीकरिता त्यांचे वाङ्मय जसे आरोग्यवर्धक ठरते तशाच त्यांच्या संपादकीय मौल्यवान आहेत.

डॉ. मेश्राम यांच्या वैचारिक चिंतनशील वृत्तीतून संपादकीय घडल्या आहेत. त्यांच्या प्रत्येक संपादकीय मध्ये सामाजिक जाणीवेचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

**लोकानुकम्पामधील निवडक संपादकीय :-**

जा.फे.मा (१९८८) च्या अंकाचा संपादकीय विषय 'रिडल्स आहे. रिडल्स प्रकरणावर प्रतिक्रिया देताना डॉ.योगेंद्र मेश्राम म्हणतात, विचार मरत नसतो, खऱ्या विचारवंताला जात नसते. आणि जातिवंत विचारवंत म्हणूनच आज अभिव्यक्ती व विचारस्वातंत्र्याचे संरक्षण व जतन करू इच्छित आहेत ही खरोखरच समाधानाची बाब समजली पाहिजे. असे असले तरी त्याचे स्वातंत्र्याच्या विरोधात वादळ उठविले जाते आणि त्या घोषणा हिंसाचाराच्या घटना होऊन जातात. येथे प्रबोधनाच्या विचारमूल्यांनाच डावलण्याचा आज प्रयत्न चालला आहे. पण प्रभावी व मूलगामी विचार म्हणून जगभर प्रसृत होतच राहतो. तो मरत नसतो. व्हॉल्टेयर जसा मेला नाही, त्याचप्रमाणे येथे आंबेडकरांनाही कुणाला मारता यावयाचे नाही. कोणी मारू म्हटल्याने त्यांचा विचार मरणार नाही. तेव्हा या रिडल्स प्रकरणाने डॉ.आंबेडकरांचा आणि आपल्या समग्र भारतीय प्रबोधनाचाच पराभव झाला अथवा होणार आहे. ही चिंता आपल्याला बाळगण्याचे कारण नाही. सत्याचा

कधीच पराभव होत नसतो. पराभव तर असत्याचा अटळ असतो. इथे रूढी-परंपरावाद्यांच्या आंधळ्या समजुतीचे एक दिवस मरण होणार आहे. सॉक्रेटिस ब्रुनोला चार्वाक-बुद्ध-खिस्ताला, कार्ल मार्क्स, मार्टिन ल्युथर किंग ला, लिंकन, केनेडिला, फुले, आगरकर, गांधी, आंबेडकर या सर्व महामानवांना अपरिमीत छळ सोसावा लागला. छातीवर गोळ्या घेऊन मरावे लागले. त्यांचा विचार मात्र कुणालाही कधीच मारता आलेला नाही. (पृ.१०,११)

जा-फे-मा १९८९च्या संपादकीय मध्ये महात्मा फुले क्रांती-ज्योत होती, दुर्गंधी जाळणारी. या संदर्भात रिडल्स इन हिंदुइझम आणि गुलामगिरी हे ग्रंथ लिहिण्यामागे क्रमाने डॉ.आंबेडकरांप्रमाणेच महात्मा फुल्यांचाही-बहुजन समाजाची जागृती करणे, प्रबोधन करणे, विभूती/देवपूजा किंवा ग्रंथप्रामान्याच्या जागी बुद्धी प्रामान्यवाद पेरणे कर्मकांड व अंधश्रद्धेच्या चिखलातून बाहेर काढणे, त्याला रूढीवादाऐवजी बुद्धीवादी बनविणे, डोळस करणे हाच हेतू होता. म्हणूनच फुले क्रांतीची ज्योत ठरतात. ही ज्योत इथला अपरिवर्तनवादी दुर्गंधाला जाळून टाकते. धम्मचक्र प्रवर्तन विशेषांक १९८९च्या संपादकीय मध्ये समाज परिवर्तनाच्या मार्गावर आजचा समाज मागे की पुढे? असा प्रश्न विचारून सामाजिक प्रबोधन व परिवर्तनाचा विचार हा आजचा युगविचार आहे, जे हा युगविचार आठवतील ते प्रकाशाच्या गतिमान जगाबरोबर जातील. जे स्वीकारणार नाहीत त्यांना हे युगच नाकारणार आहे. दलित साहित्य चळवळ संक्रमणावस्थेतून जात आहे. तिच्या धक्क्याने पुढील परिवर्तनाचा प्रकाश हाती सापडत असतो. बुद्धाचा अत्यंत तर्कशुद्ध असा प्रतीत्यसमुत्पाद सिद्धांत हेच सांगतो. आज हे असे असले तरी, उद्या हे असेच असणार नाही, दिवस आमुचा येत आहे. तो घरी चूप बसणार नाही! तेव्हा नव्या जिद्द-जोमाची व उत्साहाची तेजस्वी प्रतिमा-किरणे चळवळीला हवी आहेत. ती किरणेच या संक्रमणकालीन धुक्यांना पार छेदून-भेदून पुढे जाऊ शकतात. चळवळीच्या डोळ्यापुढील धुसर दिशा पुन्हा स्पष्ट होऊ शकतात. हे हळू-हळू होत आहे. होणारच आहे. नवोदितांनी निराश व्हायचे कारण नाही. मात्र येथे सामर्थ्य पाहिजे, हाडाच्या जातिवंताचे पुढे येणे जीवनाला कवटाळूनी घेती जे, संघर्ष जगणे-संघर्ष जगणे. या संपादकीय मधून डॉ.मेश्राम प्रश्न ही उपस्थित करतात आणि त्याची समर्पक उत्तरे देतांना ही दिसतात. यातच त्यांच्या संपादकीय लिखाणाचे रहस्य दडलेलं आहे.

ए-म-जू १९९० च्या अंकातील संपादकीयमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म-शताब्दीच्या निमित्ताने लिहितात. यात १९९०-९१ हे वर्ष सामाजिक न्याय व समतावर्ष म्हणून घोषीत केले. आता हे कार्यक्रम सरकारी असो, की सामाजिक पातळीवर असो केवळ साजरे केले जातात की राबविले जातात हा प्रश्न आहे. पंतप्रधान श्री.व्ही.पी.सिंग यांनी तर या शताब्दीवर्षाच्या निमित्ताने डॉ.आंबेडकरांना भारतरत्न ही उपाधी बहाल करून त्यांचा राष्ट्रपुरूष म्हणून अधिकृतरीत्या गौरव नोंदविला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ४० वर्षात जी गोष्ट कोणीही केली नाही, ती सध्याचे पंतप्रधान व्ही.पी.सिंगानी केली. यात राजकारण काहीही असले तरी ते पहिले श्रेय श्री.सिंगानीच घेतले आणि कोट्यावधी दलित जनतेची आपुलकी जिंकली. डॉ.बाबासाहेबांच्या मरणोत्तर उशिरा का होईना हा बहुमान देऊन भारत देशाच्या गौरवात एकप्रकारची भरच टाकण्यात आली.

दलितांच्या सामाजिक राजकीय हक्कासाठी सतत झगडणारी सगळ्यात लढाऊ चळवळ कोणती असेल, तर ती आजची आंबेडकरी (दलित) चळवळ होय, हे कुणालाही नाकारता येणार नाही. आंबेडकरी चळवळीचे (त्यात सामाजिक-सांस्कृतिक साहित्यिक) हे अत्यंत मूलगामी व महत्त्वाचे कार्य लक्षात घेता आजच्या सगळ्या पुरोगामी प्रवाहामध्ये दलित चळवळ ही सेनापतीस्थानी उभी राहावी, नव्हे सर्व समाजाने तिला आज केन्द्रस्थानी जागा देणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी-वर्षाचे थोडेबहुत फलित हाती लागण्याच्या दृष्टीने दलितोत्तर समाजाला आवश्यक आहे. तेव्हा आंबेडकरी विचाराची वा संपूर्ण आंबेडकरवादाची पृथकपणे फोड करून मांडणारे नव्या आर्थिक, सामाजिक संदर्भात त्याचा अन्वयार्थ लावणारे समतोल बुद्धीचे चिकित्सक विचारवंत, संशोधक, तत्त्वज्ञ आणि भाष्यकार पुढे येणे आवश्यक आहे असा मोलाचा संदेश या संपादकीय मधून डॉ.मेश्राम देतात.

ऑ-नो-डि१९९० च्या संपादकीयमध्ये प्रदुषणाच्या प्रभावात सरलेले वर्ष असा आपला अभिप्राय नोंदवतात. जंगली-चित्ते, सिंह वगैरे पुन्हा या चळवळीतून पुढे येणे जरूरीचे आहे. तेव्हाच डॉ.आंबेडकरप्रणीत सामाजिक लोकशाहीचे आणि मानवी जीवनाचे समृद्धसुंदर न्यायमंदिर आपल्याला उभारता येईल. जु-ऑ-स१९९५ संपादकीय मध्ये डॉ.योगेंद्र मेश्राम लिहितात, नवोदित कवी आणि त्यांची कविता (पृ.४०) अलीकडच्या काही नवोदितांनी

असं कवितेचं रात्रीचं कीर्तन-भजन करून टाकलं आहे. भजन, गीत, पद म्हणजे काव्य नव्हे गीत-पद वेगळे, कविता वेगळी गीत-पदाच्या पंक्तीचा वेगळा अर्थ वा संदर्भ शोधावा लागत नाही. भजन-गीतामध्ये बहुधा संदर्भ नसतो. सरळ अर्थ असतो. तो वाच्यार्थ वाचताक्षणीच समजतो. त्याचेच ट-ला-ट-रो-ला-रोच्या यमकात बसविलेली गीत भजन बनते. त्याचा अर्थ उकलावा लागत नाही. कविता उकलावी-समजून घ्यावी लागते. तिचा अर्थ संदर्भ शोधावा लागतो. जेव्हा चार-सहा ओळीच्या लहानशा कवितेत साध्या शब्दा मागेही एवढा मोठा आशय संदर्भ सापडतो. तेव्हा वाचकाला त्या कवितेचे व कविचे कौतुक वाटते. कवितेच्या उदरात संशोधनाला भरपूर खोली हवी. जी स्वत: अत्यंत कमी बोलते परंतु वाचकानांच अधिक बोलायला भाग पाडते.

ए-मे-जुन-२००० या अंकातील संपादकीयमध्ये देशापुढील कालची आव्हाने या विषयाला धरून सनदशीर मार्गाने आणि नाहीतर न जुमानणाऱ्या सत्तांधुदांचा हा सारा अन्यायमूलक आंधळा खेळ खलास करण्यासाठी क्रांतीचाच अंतीम मार्ग स्वीकारणे आता अटळ आहे. असा सल्ला डॉ.मेश्राम देतात. ऑ-नो-डि-२००१ धम्मचक्रप्रवर्तन विशेषांकातील संपादकीयमध्ये क्रांतीप्रवण बुद्धाचे तत्त्वज्ञान शांतीचे स्मारक बुद्धाचे शांती अहिंसेचे तत्त्वज्ञान, शेवटी बुद्ध हाच सर्व दुखण्यावर एकमेव इलाज आहे असे सुचवितात. जु-ऑ-स्पटें-२००३ च्या संपादकीय 'भारताचे स्वातंत्र्य : एक चिंतन' मांडतात देशाचे स्वातंत्र्य हे सर्व देशवासियांचे स्वातंत्र्य. पण सर्वसामान्य माणूस स्वातंत्र्याचा या ५६ व्या सुखसोहळ्यात आजतरी कुठे दिसतो-कुठे बसतो? त्याची सारखीच उपेक्षा चाललेली दिसते. येथील फक्त १५ टक्के श्रीमंत-सुखवस्तु लोक सामाजिक-धार्मिक-आर्थिक अशा सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेताना दिसतात. बाकीच्या ८५टक्के बहुसंख्य मूळ भारतीयांना भारताच्या स्वातंत्र्याचे काय करावे? हा प्रश्न आहे. तो ५६ वर्षाच्या स्वातंत्र्याने आजतागायत पूर्णपणे सोडविलेला नाही. ही वस्तुस्थिती मांडतात. यात भारिप च्या एकीकरणावरही भाष्य करतात. तसेच माईसाहेब आंबेडकर आदिवासीचे उत्थानकर्ते क्रांतीकारी नेते बाबुराव मडावी, महाराष्ट्राचा ऑडिटकार ज्येष्ठ कवी प्रल्हाद चेंदवणकर-ह्यांचा दु:खद निधनाबद्दल लोकानुकम्पा-परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहतात, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर- २००६ ची संपादकीय आणखी हे थोडे विश्लेषण या विषयाला धरून आंबेडकरवादी साहित्य की दलित साहित्य?या विषयावर आपली सखोल अभ्यासपूर्ण मते नोंदवितात.

ऑक्टो-नो-डिसें २००६ ची संपादकीय सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने धम्मक्रांती-दिनाचा संदेश या विषयाला धरून बौद्ध धम्म-प्रचार-प्रसाराचे कार्य आधीच्याहून आज अधिक गतिमान झालेले दिसते. हे या सुवर्ण महोत्सवी-वर्षाचे अपेक्षित फलित समजायला हरकत नाही असा आशावाद मांडतात. डॉ. योगेंद्र मेश्राम हे प्रंचड आशावादी होते. त्यांचा आशावाद हा निरर्थक नसून सार्थक होता. त्यासाठीच त्यांनी संपादकीय लिहण्यासाठी प्रगाढपंडिताची प्रतिभा वापरल्याचे दिसते. त्यांचा व्यासंग दिसतो. तो खालील प्रमाणे :-

१.समाजपरिवर्तनाला गती देणारे संपादकीय भाष्य
२.बुद्धीवादी, विज्ञाननिष्ठता.
३.सर्जनशील वाङ्मयीन जीवनमूल्य
४.स्त्रीमुक्तीचे तत्त्वज्ञान स्वच्छपणे मांडणारे भाष्य
५.समता-सामाजिक न्यायसाठी केलेली संपादकीय भाष्य
६.नव्या सामाजिक जाणिवा, नवे दृष्टीकोन संपादकीय मधून दिसतात.
७.मनुष्याची सद्सद् विवेकबुद्धीला आवाहन करणारे भाष्य

थोडक्यात डॉ. योगेंद्र मेश्राम यांची संपादकीय म्हणजे वेदना विद्रोहाची अभिव्यक्ती आहे. नव्या समाजरचनेचे स्वप्न पाहणारी संपादकीय सर्जनशील परिवर्तनाला सामोरे जाणारी आहे. त्यांच्या संपादकीयमुळे समाजाला त्यांच्या पावित्र्य, प्रांजळ, स्वच्छ, शुद्ध आणि प्रामाणिक भूमिकेचे, आशयाचे सविस्तर सर्वांगसुंदर दर्शन समस्त बहुजनांना त्यांच्या संपादकीय वाचल्या तर त्यांच्या जीवनात सुख समाधान शांतीची रम्य प्रकाशमय पहाट अचानक उगवावी आणि त्याचे जीवन घडून जावे इतके सामर्थ्य डॉ. योगेंद्र मेश्राम यांचा संपादकीय मध्ये आहे. असे त्यांचा सगळ्या संपादकीय वाचल्या नंतर लक्षात आले.

ह्या सगळ्या विशेषांकाचे संपादकीय एकत्र करून त्याचे सर्वांगसुंदर असा एक ग्रंथ तयार व्हावा अशी संशोधनकर्त्यांची रास्त अपेक्षा असणे यात काय चुकीचे आहे?

□□□

**प्रा. मुकेश भा. सरदार**
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, चिखलदरा, जि.अमरावती